CNR-MHSI01-000846-2017

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | :— | १५/१२/२०१७ |
| नोंद केल्याचा दिनांक | :— | ०६/०१/२०१८ |
| निकाल दिनांक | :— | ०५/०४/२०२१ |
| कालावधी | :— | व. म. दि.<br>०३ ०३ २० |

सिंधुदुर्ग—ओरोस येथील **मोटार अपघात न्यायाधिकरण** न्यायालयात
(शि. व. हांडे, अध्यक्ष यांचे समोर)

**मोटार अपघात दावा अर्ज क्र. ०1/२०1८**

**नि.क्र. 1०४**

सर्वेश राघोबा गांवकर,
वय २५ वर्षे, धंदा— व्यापार,
रा. ४९१, स्वप्नपूर्ती, आशिये रोड,
सोनगेवाडी, कणकवली, ता. कणकवली,
जि. सिंधुदुर्ग. } **अर्जदार**

**विरूध्द**

१. महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळ,
द्वारा—कणकवली डेपो मॅनेजर, कणकवली,
ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग.

२. श्री. रूपेश रमेश ठाकूर,
वय सुमारे २७ वर्षे, धंदा—एस.टी. चालक,
रा. दारिस्ते, पवारवाडी,
ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग. } **सामनेवाले**

**मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १६६(ब) कलम १६५(१)अन्वये रक्कम रू. ६,००,०००/— करीता.**

==========================================================

अर्जदारातर्फे विधिज्ञ — श्री. डी.के. अंधारी,
सामनेवाला क्र.१ व २ तर्फे विधिज्ञ — श्रीमती एस.आर. मसुरकर.

==========================================================

.....

## -: न्या य नि र्ण य :-

(निकाल दिनांक ०५ एप्रिल, २०२१)

१.        प्रस्तुत अर्ज मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १६६(ब) कलम १६५(१) खाली सामनेवाला क्र.१ व २ यांचेकडून नुकसानी मिळणेकरीता करणेत आलेला आहे. सामनेवाला क्र.१ ही अपघातग्रस्त वाहनाची मालक असून सामनेवाला क्र.२ हा अपघातग्रस्त एस.टी. बसचा चालक आहे.

२.        अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की,

दिनांक २७/०७/२०१७ रोजी सकाळी ९—०० वाजता अर्जदार स्वत:च्या मालकीची इन्होव्हा कार क्र.एमएच—०४—डीडबल्यू—७३८७ घेवून कुटूंबियांसमवेत कणकवली येथून जांभवडे येथे जात असताना सदर कार हळवल, पिंपळवाडी, ता. कणकवली येथे आली असता विरूध्द दिशेने सोनवडे—कणकवली अशी जाणारी एस.टी.बस वेगाने येवून इन्होव्हा कारला धडकली. अपघातसमयी सामनेवाला क्र.२ हा अत्यंत वेगाने, निष्काळजीपणाने व रस्त्याच्या विशिष्ट परिस्थितीचा विचार न करता आपल्या ताब्यातील एस.टी.बस चालवित होता व त्याला एस.टी.बसचे नियंत्रण न करता आल्याने इन्होव्हाची समोरच्या बाजूने तसेच चालकाच्या पूर्ण बाजूने नुकसानी केली.

३.        अर्जदाराने पुढे असेही कथन केले की, सदर अपघातात त्याचे कुटूंबियांना फारशा दुखापती झाल्या नाहीत. परंतु, इन्होव्हा कारचे प्रचंड नुकसान झाले. एस.टी.बस रस्त्याची मध्यरेषा ओलांडून पलीकडे चुकीच्या बाजूला गेली व इन्होव्हा गाडी डांबरी रस्त्याच्या बाहेर मातीच्या रस्त्यावर गेली. सदर अपघात हा एस.टी.बसचा चालक सामनेवाला क्र.२ याचे चुकीमुळे घडलेला आहे. सामनेवाला क्र.२ याचेविरूध्द कणकवली पोलीस ठाणे येथे भा.दं.वि.क.२७९, मोटार वाहन अधिनियम १८४ अन्वये गुन्हा रजि.क्र.२४१/२०१७ प्रमाणे नोंद झालेला असून त्याचेविरूध्द कणकवली न्यायालयात खटला दाखल आहे. प्रस्तुत अपघातात इन्होव्हा कारचे चालक म्हणजेच अर्जदार यांची काहीही चूक नव्हती.

४.    अर्जदाराचे पुढे असेही कथन आहे की, दिनांक २७/०७/२०१७ रोजीच्या अपघातानंतर पंचनामा झाल्यावर अर्जदार याने श्री. आर. एम. गवंडे सर्व्हेअर व्हॅक्युअर ॲण्ड इन्व्हेस्टीगेटर यांना घटनास्थळावर बोलावून त्यानी कारची प्रत्यक्ष पहाणी केली व अहवाल दिला. पुढे दिनांक ०१/०८/२०१७ रोजी अर्जदार यांने इन्होव्हा कार क्रेनच्या सहाय्याने टोचन करून टोयाटो शरयु ऑटोमोबाईल्स, म्हापसा—गोवा येथे दुरूस्तीसाठी नेली होती. त्याठिकाणी कारची पहाणी करून गाडी न खोलता प्रथम दुरूस्तीसाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक सर्वसाधारणपणे रक्कम रू. ४,३२,०००/— एवढे होईल, असे सांगितले. तेव्हा अर्जदाराच्या कारचा विमा हा सर्वसमावेशक नसल्याने दुरूस्तीची रक्कम इन्होव्हा कारच्या न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीकडून मिळणार नसल्याचे समजले. सदरचा खर्च मोठा असल्याने अर्जदार याने इन्होव्हा कार पुन्हा कणकवली येथे आणली.

५.    अर्जदाराचे पुढे असेही कथन आहे की, त्याने पैशांची जुळवा—जुळव करून इन्होव्हा कार पुन्हा शरयु ऑटोमोबाईल्स, म्हापसा—गोवा येथे नेण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे दिनांक ०९/०८/२०१७ रोजी सदरची कार पुन्हा सापळे क्रेनच्या सहाय्याने टोचन करून म्हापसा—गोवा येथे नेली. त्यानंतर सदर कारचे नुकसानी झालेले पार्टस् तसेच कारची चारही चाके बदलून दिनांक २२/०९/२०१९ रोजी इन्होव्हा कार दुरूस्ती होवून ताब्यात मिळाली. त्यावेळी कारचा एकूण दुरूस्ती खर्च रक्कम रू.३,९०,०००/— शरयु ऑटोमोबाईल्स, म्हापसा—गोवा याना अदा करावा लागला. अपघाताचे वेळी कारच्या दरवाजात बसविलेली सेंट्रल लॉक सिस्टिम खराब झाल्याने ती सापळे ऑटोमोबाईल्स यांचेकडे रक्कम रू.४,५००/— खर्च करून बसवून घेतली.

६.    अर्जदाराचे पुढे असेही कथन आहे की, अपघात झालेपासून ते कार पूर्ण दुरूस्त होईपर्यंत म्हणजेच दिनांक २७/०७/२०१७ पासून दिनांक २२/०९/२०१७ रोजीपर्यंत अर्जदाराचे ताब्यात कार नसल्याने त्याची व त्याचे कुटूंबियांची गैरसोय झाली. अनेक वेळा त्यांना भाडयाची गाडी घेवून जावे लागत

असे, त्यासाठी त्याला अंदाजे रक्कम रू.२७,०००/— एवढा खर्च झाला व अर्जदाराचे कुटूंबियांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. त्यामुळे झालेल्या गैरसोयीची ठराविक रक्कम रू.१,३४,४३०/— एवढी होते. म्हणून अर्जदार याने सामनेवाला क्र.१ व २ यांचेकडून संयुक्तिक रित्या व वैयक्तिकरित्या एकूण नुकसानी रक्कम रू.६,००,०००/— (रूपये सहा लाख मात्र) ची व्याजासह मिळावी, अशी मागणी केली आहे.

७.	सामनेवाला क्र.१ व २ यांना आदेशिकेची बजावणी होवून ते सदर प्रकरणात हजर झाले.

८.	सामनेवाला क्र.१ व २ यानी नि. १२ प्रमाणे आपले लेखी म्हणणे देवून अर्जातील म्हणणे स्पष्ट शब्दात नाकारलेले आहे. सामनेवाला यांचे असे म्हणणे आहे की, सदरचा अपघात अर्जदार याने वाहन अविचाराने व निष्काळजीपणाने चालविल्यामुळे झालेला आहे, सदरचा दावा मोटार अपघात न्यायाधीकरण यांचेकडे चालणारा नाही. तसेच आवश्यक पक्षकाराची बाधा असल्याने सदर अर्ज रद्दबातल होणेस पात्र आहे व अर्जदारानी केलेली मागणी निराधार, अवास्तव व अमर्याद आहे. तसेच मोटार वाहन अधिनियम कलम १६६(ब) व कलम १६५(१) अन्वये सामनेवाले नुकसान भरपाई देणेस जबाबदार नाहीत. म्हणून सामनेवाला यानी अर्जदारांचा दावा खर्चासह रद्द करण्यात यावा, अशी विनंती केलेली आहे.

९.	अर्जदार व सामनेवाला यांचे कथनाआधारे या न्यायाधीकरणाने नि. १३ प्रमाणे मुद्दे काढलेले आहेत. मुद्दा क्र.२ मध्ये जरी सदरचा अपघात अर्जदार याने मोटारसायकल निष्काळजीपणाने चालविल्यामुळे झाल्याचे सामनेवाला शाबीत करतात काय? असा मुद्दा रचित केला असला तरी प्रस्तुत प्रकरणात इन्होव्हा गाडी व एस.टी यांचा अपघात झाल्यामुळे सदरचा मुद्दा प्रस्तुतच्या न्यायनिर्णयामध्ये मोटारसायकल ऐवजी इन्होव्हा गाडीचा संदर्भ देवून त्याचा ऊहापोह केला आहे. तसेच सदरच्या न्यायाधीकरणास दावा चालविण्याचा

अधिकार नसल्याचा मुद्दा सामनेवाल्याने अंतिम युक्तिवादाचे वेळी उपस्थित केलेला असल्यामुळे व वैधानिक मुद्दा केव्हाही रचित करता येत असल्यामुळे सदरचा मुद्दा न्यायनिर्णयाचेवेळी रचित केलेला आहे. याबाबत दिनांक २०/०३/२०२१ रोजी न्यायनिर्णयाचा टप्पा बदलून अर्जदाराने अधिक न्यायनिर्णय दाखल करण्यासाठी मुदत दिली असतानासुध्दा दोन्हीही पक्षकारांपैकी कोणीही सदरहू मुद्यावर पुरावा द्यावयाचा आहे, असे लेखी किंवा तोंडी सांगितलेले नसल्यामुळे मुद्दा क्र.३ रचित करून ऊहापोह केलेला आहे. सदर मुद्दे व त्यावरील या न्यायाधीकरणाचा सकारण निष्कर्ष खालीलप्रमाणे देणेत येत आहे.

| **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) सामनेवाला क्र.२ याने एस.टी.बस क्र.एमएच—२०—डी—९७६१ ही अविचाराने व निष्काळजीपणाने चालविल्यामुळे आणि त्याचा परीणाम म्हणून अर्जदार याची इन्होव्हा कार क्र.एमएच—०४—डीडब्ल्यू—७३८७ चे निरंतर नुकसान झाले आहे काय? | .. | होकारार्थी. |
| २) सदरचा अपघात अर्जदार याने मोटारसायकल निष्काळजीपणाने चालविल्यामुळे झाल्याचे सामनेवाला शाबीत करतात काय? | .. | नकारार्थी. |
| ३) सामनेवाला क्र.१ व २ यानी सदरचा दावा या न्यायाधीकरणापुढे चालणारा नसल्याचे शाबीत केले आहे काय? | | नकारार्थी. |
| ४) अर्जदार नुकसानी मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास किती आणि कोणाकडून? | .. | सामनेवाला क्र.१ व २ यानी संयुक्तिकरित्या व वैयक्तिकरित्या अर्जदार यांना रक्कम रू. ५,१५,५७०/— (रू. पाच लाख पंधरा हजार पाचशे सत्तर मात्र) नुकसान भरपाई व त्यावरील द.सा.द.शे.९ टक्के दराने व्याजासहीत देणेची जबाबदारी आहे. |

५) आदेश काय?                                   .. अर्ज अंशत: मंजूर करणेत येत आहे.

—: **का र ण मी मां सा** :—

१०.        अर्जदाराने आपल्या दावा अर्जाच्या समर्थनार्थ अर्जदार सर्वेश राघोबा गांवकर (अ.सा.क्र.१)(नि.१४) यानी सत्यप्रतिज्ञापत्रावर जबाब दिलेला आहे व राजू मधुकर गवंडे (अ.सा.क्र.२)(नि.४८), सुरज महाबळेश्वर पाटील (अ.सा.क्र. ३)(नि.५१), ओंकार दिपक हिर्लेकर (अ.सा.क्र.४)(नि.७६), सुदेश गंगाराम राउत (अ.सा.क्र.५)(नि.८५) व वासुदेव केशव महाले (अ.सा.क्र.६)(नि.८९) याना तपासलेले आहे. तसेच अर्जदार याने दोषारोपपत्र (नि.६), घटनास्थळ पंचनामा (नि.७), सामनेवाला क्र. २ याचा वाहन चालविण्याचा परवाना (नि.४५), अर्जदार याच्या इन्होव्हा कारची विमा पॉलीसीची प्रत (नि.४६), अर्जदार याचा वाहन चालविण्याचा परवाना (नि.४७), इन्होव्हा गाडीच्या दुरूस्ती खर्चाबाबात शरयू ॲटोमोबाईन्स—गोवा यानी दिलेले अंदाजपत्रक (नि.५२), शरयू टोयोटा यांचेकडील खर्चाच्या पावतीच्या मूळ प्रती (नि.५३ ते ५९), अपघातग्रस्त इन्होव्हाला टोईंग करून गोवा येथे नेण्याची सापळे टोईंग सर्व्हीसेसची बीले (नि. ७७ व ७८) इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

११.        सामनेवाला यानी आपले बचावाच्या पुष्ठ्यर्थ सामनेवाला क्र.२ रूपेश रमेश ठाकूर (सा.सा.क्र.१)(नि.९२) यानी सत्यप्रतिज्ञापत्रावर जबाब दिलेला आहे. तसेच सामनेवाला क्र.३ यानी कागदोपत्री पुरावा दिलेला नाही.

१२.        अर्जदारातर्फे विधिज्ञ श्री. डी. ए. अंधारी व सामनेवालांतर्फे विधिज्ञ श्रीमती एस. आर. मसुरकर यांचा युक्तिवाद ऐकला.

१३.        अर्जदारातर्फे असा युक्तिवाद करणेत आला की, दिनांक २७/०७/२०१७ रोजी सकाळी ९—०० वाजता अर्जदार स्वत:च्या मालकीची इन्होव्हा कार क्र.एमएच—०४—डीडब्ल्यू—७३८७ मधून कुटूंबियांसमवेत कणकवली

येथून जांभवडे येथे जात असताना सदर कारला समोरून येणाऱ्या एस.टी.बसच्या चालकाने म्हणजेच सामनेवाला क्र.२ याने अत्यंत वेगाने, निष्काळजीपणाने व रस्त्याच्या विशिष्ट परिस्थितीचा विचार न करता गाडी चालवून इन्होव्हा गाडीच्या समोरच्या बाजूने गाडी घासून गेल्याने सदर गाडीचे व इतर असे एकूण रक्कम रू. ६,००,०००/—एवढे नुकसान झाले. त्यापुष्ठयर्थ अर्जदार क्र.१—सर्वेश याने स्वत:चा तोंडी पुरावा तसेच अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.२—राजू गवंडे, साक्षीदार क्र. ३—सुरज पाटील, साक्षीदार क्र.४—ओंकार हिर्लेकर, साक्षीदार क्र.५—सुदेश राऊत व साक्षीदार क्र.६—वासुदेव महाले यांचा पुरावा घेतला असून सदरच्या पुराव्याद्वारे अर्जदाराच्या कारचे झालेले नुकसान सामनेवाला क्र.२ याने निष्काळजीपणाने त्याच्या ताब्यातील एस.टी.बस चालवून झाल्याचे शाबीत केले. तसेच प्रस्तुतचा दावा या न्यायालयात चालविणेस कोणत्याही प्रकारची बाधा नसल्याचे कथन करून सामनेवाला क्र.१ व २ नुकसान भरपाई देणेस संयुक्तिकरित्या जबाबदार असल्याचा युक्तिवाद केला. तसेच सामनेवाला क्र.१ व २ यांचेकडून रक्कम रू. ६,००,०००/— नुकसान भरपाई व त्यावर द.सा.द.शे. १० टक्के व्याज मिळावे, असा युक्तिवाद केला.

१४.	उलटपक्षी, सामनेवालातर्फे विधिज्ञ श्रीमती मसुरकर यांनी युक्तिवाद करताना सदर प्रकरणात अर्जदाराने स्वत:ची कार विमा संरक्षित करणाऱ्या विमा कंपनीला पक्षकार न केल्यामुळे तसेच सदरहू दावा मोटार अपघात न्यायाधीकरण यांचेकडे चालणारा नाही. पुढे असाही युक्तिवाद केला की, अर्जदाराने दाखल केलेला अपघाताचा पुरावा विश्वासार्ह नसल्यामुळे व नुकसान भरपाईची केलेली मागणी अवाजवी असून ती शाबीत न केल्यामुळे अर्जदाराचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे.

**<u>मुद्दा क्र.१ व २ बाबत:-</u>**

१५.	प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराने दिनांक २७/०७/२०१७ रोजी सामनेवाला क्र.२ याने एस.टी.बस क्र.एमएच—२०—डी—९७६१ ही अविचाराने व निष्काळजीपणे चालवून इन्होव्हा कार क्र.एमएच—०४—डीडब्ल्यू—७३८७ चे

नुकसान केल्याचे शाबीत करण्याकरीता साक्षीदार क्र.१—सर्वेश गांवकर, २—राजू गवंडे, साक्षीदार क्र.३—सुरज पाटील, साक्षीदार क्र.४—ओंकार हिर्लेकर, साक्षीदार क्र.५—सुदेश राऊत व साक्षीदार क्र.६—वासुदेव महाले यांची साक्ष नोंदविली असून त्याचेसोबत दोषारोपपत्र (नि.६) व घटनास्थळ पंचनामा (नि.७) यावर भिस्त ठेवली आहे. वरील प्रकरणी साक्षीदार क्र.१ सर्वेश (नि.१४) याचा पुरावा पाहिला असता सदर पुराव्यामध्ये अर्जदाराने दिनांक २७/०७/२०१७ रोजी सकाळी ९—०० वाजता अर्जदार स्वतःच्या मालकीची इन्होव्हा कार क्र.एमएच—०४—डीडब्ल्यू—७३८७ घेवून कुटूंबियांसमवेत कणकवली येथून जांभवडे येथे जात असताना सदर कार हळवल, पिंपळवाडी, ता. कणकवली येथे आली असता विरूध्द दिशेने सोनवडे—कणकवली अशी जाणारी एस.टी.बस वेगाने येवून इन्होव्हा कारला धडकली व त्यामध्ये इन्होव्हाची समोरच्या बाजूने तसेच चालकाच्या पूर्ण बाजूने नुकसानी झाली. त्याप्रमाणे त्याने कणकवली पोलीस ठाण्यात तक्रार दिली व सामनेवाला क्र.२ याचेविरूध्द कणकवली पोलीस ठाणे येथे भा.दं.वि.क.२७९, मोटार वाहन अधिनियम १८४ अन्वये गुन्हा रजि.क्र. २४१/२०१७ प्रमाणे नोंद झाला. त्याने पुढे असे कथन केले की, सदरहू गाडी दुरूस्त करायला रक्कम रू. ४,३२,०००/— खर्च आला. तसेच त्याने पुराव्यामध्ये इन्होव्हा गाडीचे झालेल्या नुकसानीपोटी रक्कम रूपये ६,००,०००/— ची मागणी केली आहे. उलटतपासामध्ये त्याने त्याच्या इन्होव्हा गाडीचा विमा न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीकडे काढला होता, परंतु सदर अर्जात त्याना पक्षकार केले नाही, असे नमूद केले असले तरी त्याचे गाडीचा थर्ड पार्टी इन्शुरन्स काढलेला असल्याचे मान्य केले आहे व त्यामुळे सदर विमा कंपनी या अर्जामध्ये पक्षकार नसली तरी सामनेवाला क्र.१ व २ यांच्या जबाबदारीमध्ये बाधा येत नाही.

१६.　　सामनेवाला क्र.२ याने एस.टी.बस क्र.एमएच—२०—डी— ९७६१ ही अविचाराने चालविल्याचे घटनास्थळ पंचनामा नि.७ वरून स्पष्ट होत आहे. सामनेवालातर्फे साक्षीदार क्र.२ रूपेश रमेश ठाकूर (नि.९२) म्हणजेच सामनेवाला क्र.२ याची साक्ष नोंदविली असून त्याने साक्षीमध्ये दिनांक २७/०७/२०१७ रोजी

इन्होव्हा गाडी क्र.एमएच–०४– डीडब्ल्यू–७३८७ घासून गेल्यामुळे अपघात झाल्याचे कथन केले असून सदरचा अपघात इन्होव्हा गाडीच्या चालकाच्या चुकीमुळे झाला, असे कथन केले व नुकसान भरपाईचा दावा नामंजूर करावा, असे कथन केले. उलटतपासणीमध्ये त्याने इन्होव्हा गाडीची चार चाके डांबरी रस्त्याच्या किनारपट्टीवर असल्याचे तसेच त्याचे ताब्यातील एस.टी. इन्होव्हा गाडीच्या चालक साईडला पूर्णपणे घासल्याचे व फोटोतील इन्होव्हा गाडी ही अपघातग्रस्त गाडी असल्याचे मान्य केले आहे. तसेच त्याने एस.टी. उभी असलेल्या ठिकाणापासून एस.टी.च्या मागे १० ते १५ फूट एस.टी.चे टायर उमटल्याचे मान्य केले आहे. इन्होव्हा गाडीच्या चालक साईडचे दोन्ही दरवाजे चेपलेले व त्याच्या काचा फुटल्याचे मान्य केले आहे. तसेच या अपघाताबद्दल त्याचेविरूध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याचे त्याने मान्य केले आहे. त्याने एस.टी. उभी असलेल्या ठिकाणापासून एस.टी.च्या मागे १० ते १५ फूट एस.टी.चे टायर उमटल्याचे मान्य केल्यावरून सदरची एस.टी. वेगात असल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच फोटोमध्ये एस.टी. इन्होव्हा गाडीच्या चालक साईडला पूर्णपणे घासल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच नि.९३ वरील फोटोमध्ये इन्होव्हा गाडी, एस.टी. व आजूबाजूची परिस्थिती अपघाताचे वेळची असल्याचे व सदरच्या फोटोवरून एस. टी गाडी चुकीच्या दिशेला आल्याचे दिसत आहे. सबब, अर्जदाराने सदरचा अपघात सामनेवाला क्र.२ याचे निष्काळजीपणाने झाल्याचे शाबीत केले आहे. सबब, मुद्दा क्र. १ चे उत्तर सकारात्मक व २ चे उत्तर नकारात्मक देत आहे.

**<u>मुद्दा क्र.३ बाबत:-</u>**

१७. अर्जदाराने सदरचा दावा अर्ज मोटार वाहनाची नुकसान भरपाई मिळणेकरीता दाखल केला आहे व तो या न्यायाधीकरणापुढे चालणारा नाही, असा बचाव सामनेवाला क्र.२ याने घेतला असून त्या पुष्टयर्थ त्याने मा. उच्च न्यायालयाचे "***General Manager, Kerala State Vs. K.P. Saradamma on 3rd July, 1997***" व "***Konala Maniyya Vs. Sambasivarao and Others on 21st September, 1999***" असे न्यायनिर्णय दाखल केलेले आहेत.

त्यामध्ये मोटार वाहनाच्या नुकसान भरपाईचा दावा दिवाणी न्यायालयात चालवावा, असा निष्कर्ष काढलेला आहे. उलटपक्षी, मूळ अर्जदाराने "***Divisional Manager, United India Insurance Company Ltd. Vs. Subhash and Others, 2017(4) TAC, 723 (Bom.)***" या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली आहे. सदरच्या न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता त्यामध्ये त्रयस्थ व्यक्तीच्या मालमत्तेच्या नुकसानीचा दावा न्यायाधीकरणाकडे मोटार वाहन अधिनियम कलम १६५ अन्वये चालतो, असा निष्कर्ष नोंदविला आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या न्यायनिर्णयामधील न्यायतत्व या प्रकरणाला लागू आहे. कारण, अर्जदार त्रयस्थ व्यक्ती आहे. सबब, सदरचा दावा या न्यायाधीकरणाकडे कायद्याने चालण्यास कोणतीही बाधा नाही. सबब मुद्दा क्र. ३ चे उत्तर नकारात्मक नोंदविणेत येत आहे.

**मुद्दा क्र. ४ बाबत** :—

१८. प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराने नुकसान भरपाई रक्कम रू. ६,००,०००/— सामनेवाला क्र.१ व २ यांनी द्यावेत, अशी मागणी केली असून वरील प्रकरणी अपघात सामनेवाला क्र.२ च्या चुकीमुळे झाल्याचा निष्कर्ष न्यायालयाने नोंदविलेला आहे. तसेच अर्जदाराने त्याचे पुराव्यामध्ये रक्कम रू. ६,००,०००/— नुकसान भरपाईचे प्रतिपादन करताना त्याच्या इन्होव्हा गाडीचा दुरूस्तीचा खर्च खालीलप्रमाणे झाल्याचे कथन केले आहे.

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १. | इन्होव्हा गाडीस टोयाटो कंपनीमध्ये दुरूस्तीस आलेला खर्च... | ३,९०,०००/— |
| २. | इन्होव्हा गाडीच्या चारही टायर व्हील्सबाबत ॲपेक्स २००१, गोवा यानी दिलेली बिलाची रक्कम... | २६,०००/— |
| ३. | इन्होव्हा गाडीच्या दुरूस्तीपूर्वी इस्टीमेट तयार करण्यासाठी आलेला खर्च... | ४,०७०/— |
| ४. | गवंडे सर्व्हेअर यांनी गाडीचा सर्व्हे केल्याचा खर्च... | २,५००/— |
| ५. | सापळे टोयींग सर्व्हीस यांचेमार्फत गाडी हळवल ते म्हापसा—गोवा येथे सर्व्हीस स्टेशनला दोनदा | ११,५००/— |

| | | |
|---|---|---|
| | नेण्यासाठी झालेला खर्च... | |
| ६. | सापळे ऑटो सर्व्हीसेस यांनी सेंटर लॉक बसविल्याचा खर्च... | ४,५००/— |
| ७. | अर्जदारास गाडी दुरूस्तीचे कामी गोवा येथे जाण्या—येण्यास झालेला खर्च... | २७,०००/— |
| ८. | अर्जदार याची इन्होव्हा गाडी दि.२७/०७/२०१७ ते दि.२२/०९/२०१७ पर्यंत बंद अवस्थेत राहिल्याने झालेली गैरसोय व मनस्ताप इ.बाबतची नुकसान भरपाई... | १,३४,४३०/— |
| | एकूण खर्च रू... | ६,००,०००/— |

उलटतपासामध्ये सदरहू साक्षीदाराने त्याची गाडी संरक्षित असलेल्या विमा कंपनीस पक्षकार न केल्याचे कबूल केले असून इतर सूचित कथने नाकारलेली आहेत.

१९. अर्जदाराने साक्षीदार क्र.३ सुरज महाबळेश्वर पाटील (नि.५१) याना तपासले असून त्यांनी त्यांच्या कथनामध्ये गाडी क्र.एमएच—०४—डीब्ल्यू—७३८७ या इन्होव्हा गाडीचे नि.५२ वरील इस्टीमेट दिल्याचे तसेच त्यासाठी रक्कम रू. ४,०७०/— मानधन घेतल्याचे व नि.५३ त्याची पोहोच असल्याचे कथन केले असून नि.५४ व नि.५५ वरील पावत्या अर्जदाराने अनुक्रमे रक्कम रू. १,००,०००/— व रू. १,३०,०००/— दिल्याचे कथन केले असून त्यासोबत त्यानी नि.५६ वरील रक्कम रू. ३,९०,००४/—चे इन्व्हाईस दिल्याचे कथन केले आहे. तसेच नि.५७ वरील पावती अर्जदाराने एन.इ.एफ.टी.ने रक्कम रू. १,२०,०००/—दिल्याचे कथन केले असून नि.५८ वरील पावती रक्कम रू. ४०,०००/— मिळाल्याचे मान्य व कबूल केले आहे. सदरहू साक्षीदाराने त्याचे उलटतपासामध्ये नि.५२ वरील इस्टिमेटमध्ये जी.एस.टी. व लेबर चार्ज हाताने नमूद केल्याचे व त्यावर सही नसल्याचे मान्य केले आहे. तसेच गाडीचा अंतिम सर्व्हे न झाल्याचे कबूल केले आहे. परंतु सदर गाडी त्याचे शोरूमला आली नव्हती, हे सामनेवाल्याचे कथन अमान्य केले आहे. नि.५२ ते ५६ वरील पावत्या व इस्टीमेट पाहिले असता अर्जदाराने सदरहू गाडीचे दुरूस्तीसाठी वरीलप्रमाणे खर्च केल्याचे दिसून येत आहे.

२०.  अर्जदाराने त्याचे दाव्यापुष्टयर्थ साक्षीदार क्र.२ राजू मधुकर गावडे (नि.४८) याचा पुरावा घेतला असून त्यानुसार ते मॅकॅनिकल इंजिनियर असून त्यांना कणकवली येथे इन्होव्हा गाडीची तपासणी करण्याकरीता बोलाविल्याचे व त्यानी त्या ठिकाणी जावून गाडीची तपासणी केली व गाडीचे २५ फोटो घेतले व त्याप्रमाणे अहवाल सादर केला, जो नि.४९ वर आहे. तसेच त्यांना रक्कम रू. २,५००/— फक्त दिल्याची पावती नि.५० वर असल्याचे कबूल केले आहे.

२१.  साक्षीदर क्र.४ ओंकार दिपक हिर्लेकर (नि.७६) याच्या पुराव्यावरून त्याने दिनांक ०१/०८/२०१७ रोजी व दिनांक ०९/०८/२०१७ रोजी इन्होव्हा गाडी म्हापसा गोवा येथे टोईंग करून नेल्याचे कथन केले असून नि. ७७ व ७८ वरील पावतीने पैसे अनुक्रमे रू.६,५००/— व रू.५,०००/— मिळाल्याचे कथन केले आहे. सदरहू साक्षीदाराने उलटतपासामध्ये नि.८० वरील अधिकारपत्रामध्ये सापळे ऑटो सर्व्हीसेस, कणकवलीतर्फे त्यांनी साक्ष द्यावी, असे नमूद नसल्याचे मान्य केले असलेतरी त्यामुळे त्यांचा टोईंग खर्च रक्कम रू. ६,५००/— व रक्कम रू. ५,०००/— त्याला मिळाले नाहीत, असे म्हणता येत नाही.

२२.  साक्षीदार क्र.५ सुदेश गंगांराम राऊत (नि.८५) याने त्याचे साक्षीत नि.८६ प्रमाणे इन्होव्हा गाडीच्या चारही टायरचे अलॉय व्हील्सचे रक्कम रू. २६,०००/— अर्जदार सर्वेश गांवकर याचेकडून मिळाल्याचे कबूल केले आहे. सदरहू साक्षीदाराने उलटतपासामध्ये नकारात्मक कथनाशिवाय त्यानी कोणतीही वस्तुस्थिती मान्य केलेली नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराचा पुरावा पाहिला असता अर्जदाराने रक्कम रू. २६,०००/—चे टायरचे अलॉय व्हील खरेदी केल्याचे स्पष्ट होत आहे.

२३.  अर्जदाराने साक्षीदार क्र.६ वासुदेव केशव महाले (नि.८९) याचे द्वारा ते शरयू ऑटोमोबाईल्स, बार्देस—गोवा येथे खजिनदार म्हणून कायम करीत असल्याचे व त्याचे प्रतिष्ठानात इन्होव्हा कार क्र. एमएच—०४—डीडब्ल्यू—७३८७ हे वाहन आल्याचे व त्यानी नि.५३ ते ५८ वरील पावत्या अर्जदाराचे नांवे

दिल्याचे कथन केले आहे. उलटतपासामध्ये सदरहू साक्षीदाराने सदरचे वाहन प्रतिष्ठानात दुरूस्तीकरीता कोणत्या तारखेला व कोणत्या वेळी आणले, हे सांगता येत नसल्याचे मान्य केले आहे. तथापि, प्रतिष्ठानात कोणते वाहन केव्हा येते, याची माहिती खजिनदारास/रोखपालास असण्याचे कारण नाही व ते माहीत नसल्यामुळे सदरची साक्ष अग्राह्य होत नाही. सबब, अर्जदाराने त्यांना सामनेवाला क्र.१ व २ यानी संयुक्तिकरित्या व वैयक्तिकरित्या रक्कम रू.६,००,०००/— द्यावेत, हे शाबीत केल्याचे स्पष्ट होत आहे.

२४. वरीलप्रकरणी अर्जदाराने त्याचे इन्होव्हा गाडीचे नुकसान सामनेवाला क्र. २ याचे निष्काळजीपणाने त्याचे ताब्यातील चालविलेल्या एस.टी. बसमुळे झाल्याचे तसेच सदरहू गाडी दुरूस्त करण्यासाठी झालेला खर्च रक्कम रू. ६,००,०००/— मागितले असले तरी सदरहू बाबत रक्कम रू. १,३४,४३०/—ही रक्कम नेमकी नुकसान भरपाई अर्जदाराने कशाच्या आधारे मागितली, याचा अर्थबोध होत नसून जरी अर्जदाराने त्याचे आई वडीलांना नोकरीचे ठिकाणी सोडणेसाठी गाडी घेवून आत असल्याचे कथन केले असले तरी त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा सादर न केल्यामुळे अर्जदाराची सदरची मागणी अवाजवी दिसत असून अर्जदाराने मागणी केलेली रक्कम रू. १,३४,४३०/— ऐवजी अर्जदारास झालेल्या मानसिक त्रासाबद्दल रक्कम रू. ५०,०००/— देणे योग्य आहे.

२५. सबब सामनेवाला क्र.१ व २ यानी संयुक्तिकरित्या व वैयक्तिकरित्या अर्जदारास रक्कम रू. ५,१५,५७०/— (रू. पाच लाख पंधरा हजार पाचशे सत्तर मात्र) व त्यावरील अर्ज दाखल तारखेपासून ९ टक्के प्रमाणे व्याज देणे न्याय व आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराने दावा दाखल तारखेपासून नुकसान भरपाई रक्कमेवर १० टक्के दराने व्याज मागितले असून प्रचलित न्याय तत्वाआधारे नुकसान भरपाईवर सामनेवाला क्र.१ व २ यांचेकडून ९ टक्के व्याज मिळणेस अर्जदार पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. ४ चे उत्तर येणेप्रमाणे देवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**—: आ दे श :—**

१) अर्ज अंशतः प्रमाणित खर्चासह मंजूर करणेत येत आहे.

२) सामनेवाला क्र. १ व २ यांनी संयुक्तिकरित्या व स्वतंत्ररित्या अर्जदार यांना या न्यायाधीकरणामार्फत रेखांकित धनादेशाद्वारे एकूण रक्कम रू. ५,१५,५७०/— (रू. पाच लाख पंधरा हजार पाचशे सत्तर मात्र) नुकसान भरपाई व त्यावरील अर्ज दाखल तारखेपासून द.सा.द.शे. ९ टक्के दराने व्याजासहीत द्यावेत.

३) येणेप्रमाणे अंतिम निवाडा करणेत यावा.

(न्यायनिर्णय न्यायासनावरून जाहीर केला.)

सिंधुदुर्ग—ओरोस.
दिनांकः—०५/०४/२०२१.

(शि. व. हांडे)
अध्यक्ष,
मोटार अपघात न्यायाधीकरण,
सिंधुदुर्ग—ओरोस.